सांज दैनिक बीड
RNI : Regd.No.MAH/MAR/2010/43846

# वास्तव

भारतरत्न रतनजी टाटा यांच्या महान देशभक्तीला समर्पित
२० वर्ष
एडिटर इन चिफ- जितेंद्र सिरसाट

स्क्रीन रिडरचा बादशहा




# जहां दादा खडे हो जाते हैं लाईन वहींसे शुरू होती हैं।

## मंत्री संजय शिरसाट यांचे बीड जिल्ह्यात ठीक ठिकाणी हर्षोल्लासात दमदार स्वागत

## शिवसेनेचा कोणताही कार्यक्रम असो नियोजन दादांकडे म्हंटले की, हवा तर होणारच!

## खमक्या जिल्हाप्रमुख कसा असावा हे अनिल दादा जगताप यांनी पुन्हा दाखवून दिले!







# भव्य दिव्य तिरंगा रॅलीने मंत्री संजय शिरसाट यांच्यासह बिडकर गेले भारावून

**बीड : ऑपरेशन सिंदूरच्या निमित्ताने भारतीय सैन्याने पाकिस्तानला घरात घुसून मारले, हे अवघ्या जगाने पाहिले. आज देशभरामध्ये भारतीय सैन्याच्या सन्मानार्थ तिरंगा रॅलला अफाट प्रतिसाद मिळत आहे. दरम्यान बीडमध्ये शिवसेना जिल्हाप्रमुख अनिल दादा जगताप यांनी आयोजित केलेल्या तिरंगा रॅलीला मंत्री संजय शिरसाट यांनी आवर्जून उपस्थिती लावून हिरवा झेंडा दाखवून तिरंगा रॅलीचा शुभारंभ केला. अनिल जगताप यांच्या नेटक्या नियोजनामुळे तिरंगा रॅलीला तमाम शिवसैनिकांसह बीडकरांनी तुफान प्रतिसाद दिला. अक्षरश : ही रॅली पाहून मंत्री संजय शिरसाठ तर भारावून गेलेच शिवाय बिडकरांच्या डोळ्याचे पारणे फिटले. बीड जिल्ह्यात शिवसेनेचा कार्यक्रम आणि अनिल दादा जगताप यांच्याकडे असलेले नियोजन म्हंटले की, तो कार्यक्रम भन्नाट तर होणारच यात शंका नाही. एकूणच तिरंगा रॅलीला तुफान प्रतिसाद पाहता खमक्या जिल्हाप्रमुख म्हणून अनिल दादा जगताप यांनी पुन्हा स्वत :ला सिद्ध केले, हे ही विशेष!**



## रॅलीला शिवसैनिक आणि बिडकरांचा तुफान प्रतिसाद

नापाक पाकचे मनसुबे उद्धवस्त करणारे ऑपरेशन सिंदूर यशस्वीपणे राबवणाऱ्या भारतीय सैन्याच्या सन्मानार्थ बीड शहरामध्ये शनिवार दि २४ मे २०२५ रोजी दु. 12 : 00 वाजता महाराष्ट्र राज्याचे सामाजिक न्याय मंत्री तथा शिवसेना नेते ना. संजय शिरसाट यांच्या प्रमुख उपस्थितीत बीडवासियांच्या देशभक्तीने ओथंबलेली शिवसेनेची भव्य तिरंगा रॅली संपन्न झाली. या तिरंगा रॅलीत बीडवासियांनी मोठ्या संख्येने सहभागी होऊन उत्स्फूर्त प्रतिसाद दिला तर या रॅलीत युवकांनी ट्रॅक्टरमध्ये सैनिकांची वेशभूषा परिधान करून आपले देशप्रेम व्यक्त केले. याबरोबरच असंख्य तरुण हाती तिरंगा झेंडा घेऊन भर पावसात भारत माता की जय, वंदे मातरम या घोषणा देत मोटारसायकलवर स्वार झाले. एकूणच रॅलीला तमाम शिवसैनिकांसह बीडकरांनी तुफान प्रतिसाद दिला.

## मातृभूमीसाठी बलिदान देणाऱ्या शूरवीरांना सामूहिक श्रद्धांजली अर्पण

मंत्री संजय शिरसाट यांनी सर्वप्रथम विश्ववंदनीय भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून तिरंगा रॅलीस हिरवा झेंडा दाखवून रॅलीचा प्रारंभ केला. भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यापासून ते छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्यापर्यंत ही भव्य रॅली काढण्यात आली. सर्वांनी मिळून छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्याला पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले आणि नंतर सीमारेषेवर मातृभूमीसाठी बलिदान देणाऱ्या शूरवीरांना सामूहिक श्रद्धांजली अर्पण केली. देशाच्या मातीसाठी, आपल्या लेकरांसाठी, आपल्या भविष्यासाठी आपल्या प्राणांची तमा न बाळगता लढणाऱ्या भारतीय सैन्याला अभिवादन करण्याकरिता भर पावसात बीडमधून प्रतिष्ठित नागरिक तथा असंख्य तरुण राष्ट्रीय ध्वज हाती घेऊन रॅलीत सहभागी झाले होते, यावरून बीडकरांच्या निस्सीम देशभक्ती आणि देशप्रेमाचे दर्शन घडून आले.

## यांची होती उपस्थिती

याप्रसंगी शिवसेना विभागीय सचिव अशोक पटवर्धन, बीड जिल्हा संपर्कप्रमुख बाप्पूसाहेब मोरे, जिल्हाप्रमुख अनिल दादा जगताप, सचिन मुळूक, स्वप्नील गलधर, युवासेनेचे बाजीराव चव्हाण, विपुल पिंगळे, अविनाश जाधव, सागर बहिर, अलकाताई डावकर, चंद्रकलाताई बांगर, रविराज बडे, सुजित शिंदे, गणेश शिराळे, मनोज चव्हाण यांच्यासह शिवसेना, महिला आघाडी, युवासेना, शेतकरी सेना, एसटी कामगार सेना ओबीसी व्हिजेएनटीसेना तथा अंगीकृत संघटनांचे सर्व आजी-माजी पदाधिकारी लोकप्रतिनिधी आणि शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मुक्ता आर्दड शिक्षण रत्न पुरस्काराने सन्मानित; सर्वस्तरातून होतोय अभिनंदनचा वर्षाव

बीड : प्रतिनिधी

एकता सेवाभावी संस्था, महाराष्ट्र यांच्या वतीने शैक्षणिक क्षेत्रातून शैक्षणिक कार्याच्या गौरवार्थ दिला जाणारा राष्ट्रीय शिक्षण रत्न पुरस्कार राज्याचे सहकार मंत्री ना.बाबासाहेब पाटील, शिक्षक आ. विक्रम काळे, मा.आ.रामरावजी वडकुते, प्रसिद्ध अभिनेत्री पवित्र रिश्ता फेम उषा नाडकर्णी, फिल्म अभिनेता अली खान एकता सेवाभावी संस्थेचे महाराष्ट्र अध्यक्ष अझहर खान या मान्यवरांच्या हस्ते महाराष्ट्र राज्य विनाअनुदानित शाळा कृती समितीच्या मराठवाडा महिला सचिव तथा श्री संत भगवानबाबा माध्यमिक विद्यालयाच्या शिक्षिका सौ. मुक्ता दिगंबर आर्दड



(मोटे) मॅडम यांना देऊन सन्मानित करण्यात आले. सदरील शिक्षक रत्न पुरस्कार मिळाल्याबद्दल सौ मुक्ता आर्दड (मोटे) मॅडम यांच्यावर सर्वस्तरातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे. मुंबई येथील एकता सेवाभावी संस्थेच्या वतीने दरवर्षी समाजातील विविध क्षेत्रात उल्लेखनीय काम करणाऱ्या व्यक्तींचा पुरस्कार देऊन त्यांच्या कार्याचा गौरव केला जातो. यावर्षी शैक्षणिक क्षेत्रातून दिला ● पान ३ वर...

# वैष्णवी हगवणेच्या मारेकऱ्यांना कठोर शिक्षा द्या - रत्नमाला मोटे

गेवराई : प्रतिनिधी

पुण्यातील वैष्णवी हगवणे च्या सासरच्यानी लग्नाच्या आधी हुंडा मागणी आणि विवाह झाल्यानंतर हुंड्यासाठी छळ केला हुंडा मागणी ही समाजाला लागलेला मोठा रोग असून, याच हुंडाबळीचे पुणे येथील प्रकरण राज्यात गाजत असून या हायटेक भिकारी कुटुंबामुळे एका निष्पाप वैष्णवीचा बळी गेला आहे. या प्रकरणाची राज्यभर चर्चा सुरू असल्याने चार भिंतींच्या आतील 'हुंदक्यावर' प्रकाश पडला आहे. यात राजकीय कुटुंब असल्याने राज्यभर चर्चा सुरू असून, काही आरोपी अटक आहेत. पण गोरगरिबांच्या अनेक मुली सासरकडील लोकांची डिमांड पूर्ण करु शकत नसल्याने त्रास सहन करीत असून जेंव्हा हा त्रास सहन होत नाही, तेंव्हा टोकाचा निर्णय घेऊन मृत्यूला कवटाळतात. यामुळे शासनाने याकडे गांभीर्याने लक्ष घालून हंडाबळी प्रकरणी कठोर निर्णय घ्यावा व वैष्णवीच्या मारेकऱ्यांना कठोर शिक्षा व्हावी कारण यानंतर हुंड्यासाठी मुलींना मारहाण व त्रास होणार नाही असे गेवराई भाजपा महिला अध्यक्षा रत्नमाला नानी मोटे यांनी प्रसिंद्ध ● पान ३ वर...



# युवासेना कार्याध्यक्ष पूर्वेश सरनाईक यांच्या मार्फत बीडच्या चार निष्ठावंत युवासैनिकांना स्कॉर्पिओ गाडी भेट

## बाजीराव चव्हाण यांच्या चार निष्ठावंत युवासेना पदाधिकाऱ्यांना स्कॉर्पिओ गाडीचे गिफ्ट

बीड : प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्याचे लोकप्रिय उपमुख्यमंत्री मा. एकनाथजी शिंदे साहेब, खासदार श्रीकांतजी शिंदे साहेब, युवा सेना कार्याध्यक्ष पूर्वेशजी सरनाईक साहेब यांच्या कार्याला प्रेरित होऊन महाराष्ट्रातील युवा मोठ्या प्रमाणात युवा सेनेत दाखल होताना दिसून येत आहेत. युवा सेना मराठवाडा निरीक्षक बाजीराव दादा चव्हाण यांच्या मराठवाड्यात वाढत असलेला युवा सेनेचा विस्तार युवकांसाठी आज प्रेरणा देणारा आहे. मराठवाडा निरीक्षक बाजीराव चव्हाण यांच्या कार्यप्रणालीला प्रेरित होऊन बीड जिल्हात युवासेनेचा



आवाका वाढत चालला आहे. याच कार्यप्रणालीला प्रेरित होऊन बीड मधील युवा सैनिकांनी युवा सेना वाढवण्यासाठी बाजीराव चव्हाण यांच्या खांद्याला खांदा लावून युवासेना वाढवली. आज बाजीराव चव्हाण यांच्या तालमीत वाढलेले मेहनती एकनिष्ठ ● पान ३ वर...

# मंगळवारी तिरूपती हॉस्पिटल येथे पोट विकार, मूत्रविकार मोफत तपासणी शिबीर

बीड : प्रतिनिधी

बीड शहरात नव्याने सुरू झालेल्या सुप्रसिद्ध मनका विकार तज्ञ डॉ बालाजी नवले यांच्या "तिरुपती सुपर स्पेशलिटी हॉस्पिटल नगर नाका बीड" येथे बीड जिल्ह्यातील पोट विकार आणि मूत्रविकार रुग्णांसाठी "छत्रपती संभाजीनगर येथील सुप्रसिद्ध "लेप्रोस्कोपिक सर्जन व पोट विकार तज्ञ डॉ दीपक शिंदे" यांचे मंगळवार दिनांक 27 मे 2025 रोजी सकाळी दहा ते तीन या वेळेत मोफत पोट विकार मूत्रविकार व पोटासंबंधी इतर विकारावर मोफत तपासणी व मार्गदर्शन शिबिर होणार आहे तरीही गरजू रुग्णांनी या मोफत तपासणी शिबिराचा अवश्य लाभ घ्यावा असे आवाहन तिरुपती सुपर स्पेशलिटी हॉस्पिटलच्या वतीने करण्यात आले आहे..!



यांचे मोफत पोटाच्या विकारासंबंधी तपासणी व मार्गदर्शन शिबिर होणार असून गरजू रुग्णांनी या शिबिराचा अवश्य लाभ घ्यावा..

शिबिरामध्ये मूत्ररोग, मुतखडा विकार, हर्निया, पोटाचे कुठलेही विकार, कॅन्सर पित्ताशयाचे आजार, मुळव्याध, फिशर, भगंदर पॉलीट्रोमा, दुर्बिन द्वारे होणारे पोटाचे ऑपरेशन इत्यादी विकाराने त्रस्त असणाऱ्या रुग्णांसाठी हे शिबिर आयोजीत करण्यात आले असून..जिल्ह्यातील सर्व गरजू रुग्णांनी या पोट विकार तपासणी शिबिराचा अवश्य लाभ घ्यावा नाव नोंदणी सुरू झाली आहे

7770003229 8668212331 नंबर वरती संपर्क साधून नाव नोंदणी करून घेण्याची आवाहन करण्यात आले आहे.

# समाज कल्याण मंत्री नामदार संजय शिरसाट यांचा गेवराई शहरामध्ये आंबेडकरी जनतेने केला भव्य सत्कार



गेवराई : बीड जिल्ह्याच्या दौऱ्यावर असलेले महाराष्ट्र राज्याचे समाज कल्याण मंत्री नामदार संजय शिरसाट यांचा गेवराई शहरामध्ये आंबेडकरी जनतेने भव्य दिव्य सत्कार केला. यावेळी विविध क्षेत्रातील मान्यवर आणि शिवसैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मिनाक्षीताई देवकते यांना अहिल्यारत्न पुरस्कार जाहीर

## आज सोलापूर येथे होणार थाटात वितरण सोहळा

बीड : येथील बाणाई महिला बहुउद्देशीय सेवाभावी संस्थेच्या संस्थापक अध्यक्ष मीनाक्षीताई देवकते / डोमाळे यांच्या सामाजिक कार्याची दखल घेऊन ए.डी. फाउंडेशन महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने दिला जाणारा महाराष्ट्र रत्न पुरस्कार जाहीर करण्यात आला असून आज रविवार दिनांक 25 मे 2025 रोजी सोलापूर येथील निर्मिती लॉन्स नडगिरी पेट्रोल पंपा समोर विजापूर रोड येथे सदरील पुरस्काराचे वितरण मान्यवरांच्या




उपस्थितीत करण्यात येणार आहे. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी माजी आमदार प्रकाश शेंडगे हे राहणार असून प्रमुख पाहुणे म्हणून पुणे येथील आयकर आयुक्त डॉ. नितीन वाघमोडे, मुंबईचे आयकर आयुक्त डॉ. सचिन मोटे यांच्यासह संत ज्ञानेश्वर शिक्षण संस्थेचे अध्यक्ष ॲड. चिमणभाऊ डांगे, धनगर समाजाचे नेते चेतनभाऊ नरोटे, पुणे येथील सहाय्यक पोलीस आयुक्त सौ. रुक्मिणीताई गलांडे, राम मांडूरके यांची विशेष उपस्थिती लाभणार आहे.

## सुविचार

जीवनात जे तुम्ही करता ते प्रेमाने करा.
– डॉ. स्माईल ब्लँटन

अज्ञश्चाश्रद्धानश्च संशयात्मा विनश्यति नायं लोकोऽस्तिं न परो न सुखं संशयात्मन : ।।
(भीष्मपर्व, अध्याय 28, श्लोक 40 महाभारत)
अर्थ : अज्ञ असून श्रद्धा न ठेवणारा असा संशयखोर मनुष्य सर्वथा नाश पावतो, अशा संशयात्म्याला ना इहलोक, ना परलोक, ना सुख.

## गुरू वचन



# विश्वासघात म्हणजे आत्मघात

गुरू हरगोविंदसिंहजी यांच्या अत्यंत निकटवर्तियांपैकी एक म्हणजे पाइंदे खाँ. गुरुंना त्याच्यावर स्वत : :पेक्षा जास्त विश्वास होता. त्याचे कतृत्व, त्याचे शौर्य या सा–यांवर गुरुजींचा अत्यंत विश्वास होता. परंतु पाइंदे खाँने याचा वेगळा अर्थ काढला आणि तो शिष्यांमध्ये गुरुजींचीच बदनामी करू लागला.

शिष्यांनी त्याला खूप समजावण्याचा प्रयत्न केला. परंतु, त्याचा काहीच परिणाम झाला नाही. तो कोणाचेच ऐकत नव्हता. शिष्यांनी गुरुजींनाही त्याच्या या गोष्टी सांगितल्या होत्या. गुरुजी मात्र शांत असल्याने शिष्यांना याचेही आश्चर्य वाटत होते. त्यांना कळतच नव्हते, की गुरुजींना अचानक काय झाले, पाइंदे खाँ गुरुजींच्या इतक्या जवळचा आणि तोच त्यांची बदनामी करतोय?

शेवटी गुरुजींच्या सहनशीलतेचा अंत झाला आणि त्यांनी घोषणा केली, की पाइंदे खाँला दरबारातून काढून टाकावे. यानंतर पाइंदे खाँने बंडखोरी केली आणि तो मोगलांना जाऊन मिळाला. त्याने गुरुजींना जाताना धमकीही दिली 'तुम्ही मोगलांपुढे टिकूच शकणार नाहीत' गुरुजी शांत होते त्यांनी त्याची हकालपट्टी केली.

यानंतर पाइंदे खाँ थेट शहाजानला जाऊन भेटला आणि त्याने हरगोविंदसिंहजी विरोधात त्याचे कान भरले. शहाजहानने मग काले खाँच्या नेतृत्वाखाली एक फौज गुरुंवर हल्ला करण्यासाठी पाठवली. जालंधरमध्ये मोगल आणि शीख सैन्याचे युद्ध झाले.

या युद्धात पाइंदे खाँ ने गुरुंवर हल्ला चढवण्याचा प्रयत्न केला. गुरुंनी त्याचे वार चुकवत त्याला माफी मागायला सांगितली आणि असे केले तर, मी तुला माफ करेन असे आश्वासनही त्याला दिले. परंतु तो ऐकण्याच्या परिस्थितीत नव्हता, त्याला झालेल्या गर्वाने त्याच्या मेंदूवर ताबा मिळवला होता. त्याने पुन्हा गुरुजींवर हल्ला चढवण्याचा प्रयत्न केला. परंतु त्याच्या ारसा परिणाम झाला नाही.

गुरुजींनी त्याचा हाही वार चुकवला. त्याला पुन्हा शरण येण्याचे आवाहन केले. परंतु तो ऐकण्यास तयार नव्हता. शेवटी गुरुजींना त्याचा वध करावाच लागला. इकडे मोगल सैन्याचेही बारा वाजले. त्यांचाही पराभव झाला. आणि काले खाँ आल्या पावली पळत सुटला.

## उपदेशकथा



# भगवान

एका फकिराला एकदा स्वप्न पडले. स्वप्नात तो स्वर्गात गेला. तेथे रस्त्यावर मोठी गर्दी झालेली त्याला दिसली. त्या गर्दीतील एकाला त्याने विचारले, एवढे लोक का जमले आहेत? त्या व्यक्तीने सांगितले, आज भगवानांचा जन्मदिन आहे. ते येथून जाणार आहेत. \किराला आपल्या भाग्याचा हेवा वाटला. साक्षात भगवानाचे दर्शन घडणार. थोड्या वेळाने एका उमद्या घोड्यावरुन एक राजबिंडा तरुण आला. त्याच्यामागे हजारो लोक होते. त्याला पाहून फकिराने विचारले, हेच का ते भगवान? ती व्यक्ती म्हणाली, नाही हे भगवान नाहीत. हे राम आहेत. त्यांना मानणारे लोक त्यांच्यामागून जात आहेत... याच पद्धतीने येशू, बुद्ध, महावीर... सर्वजण येऊन गेले. भगवानांची वाट पाहता पाहता मध्यरात्र झाली. सारे लोक कंटाळून निघून गेले. आणि त्या निर्मनुष्य रस्त्यावरुन एक म्हातारा एकटाच आला. फकिराने त्याला विचारले, आपणच भगवान? म्हातारा म्हणाला, हो. फकिराने विचारले, मग आपल्यामागून कोणीच कसे येत नाही? डोळ्यात अश्रू आणत तो म्हातारा म्हणाला, सारे राम, महावीर, बुद्ध, येशूबरोबर गेले. जो कोणाबरोबर जात नाही, तोच माझ्याबरोबर येऊ शकतो

# दारात चुकूनही ठेवू नका 'या' गोष्टी, अन्यथा करोडपती देखील होईल रोडपती

वास्तुशास्त्र हे सकारात्मक आणि नकारात्मक उर्जेवर आधारित आहे. असे म्हटले जाते की, वास्तूशास्त्रानुसार घर बांधल्यास घर कोणत्याही प्रकारचे अडथळे येत नाहीत. घरात सुख–समृद्धी आणण्यासाठी वास्तुशास्त्राचे नियम खूप प्रभावी मानले जातात. सकारात्मक ऊर्जा घरात सुख–समृद्धी आणते तर नकारात्मक ऊर्जा जीवनात अनेक समस्या घेऊन येते. अनेक वेळा सर्व काही योग्य पद्धतीने करूनही माणसाला पुन्हा पुन्हा अपयशाला सामोरे जावे लागते. वास्तूशास्त्रानुसार, व्यक्तीच्या काही सवयी त्यांच्या प्रगतीमध्ये अडथळा आणतात, ज्यामुळे घरात आर्थिक संकट येते .आज आम्ही तुम्हाला दारात कोणत्या गोष्टी ठेवू नये या विषयी सांगणार आहेत.







### दारात झाडू ठेवू नका

हिंदू धर्मात झाडूला केवळ स्वच्छतेसाठी नाही तर लक्ष्मी देवीशी निगडीत असते. झाडू संबंधीचे अनेक महत्त्वाचे नियम वास्तुशास्त्रात सांगण्यात आले आहेत. वास्तुशास्त्रात सांगितले आहे की झाडू अशा ठिकाणी ठेवू नये की दरवाजा उघडताच समोर दिसतो. झाडू लपवून ठेवणे चांगले मानले जाते.

### घरात निर्माण होईल वास्तूदोष

वास्तूशास्त्रानुसार गॅस सिलेंडर कधीही दरवाजा उघडताच कधीही समोर दिसेल असा ठेवू नये. अन्यथा वास्तू दोष निर्माण होईल.

### कधीही ठेवू नका या गोष्टी

अनेकजण घराच्या मुख्य प्रवेशद्वारावर शूज आणि चप्पलचे स्टँड ठेवतात. पण वास्तूशास्त्रानुसार असे करणे योग्य नाही. दरवाजात चप्पलचे स्टँड ठेवल्यास घरात नकारात्मक ऊर्जा प्रवेश करू शकते. यासोबतच मुख्य प्रवेशद्वाराजवळ तुटलेल्या खुर्च्या, डस्टबिन किंवा स्टूल इत्यादी ठेवणे टाळावे.



### या गोष्टी ठेवा दारात

घरामध्ये सकारात्मकता टिकवून राहण्यासाठी गणपती बाप्पाची मूर्ती मुख्य प्रवेशद्वारावर ठेवता येते. यासोबतच मुख्य प्रवेशद्वाराजवळ तुळशीचे रोप ठेवणे देखील शुभ मानले जाते. त्याचबरोबर मुख्य प्रवेशद्वारावरील स्वच्छतेकडे विशेष लक्ष द्यावे. असे केल्याने सकारात्मक ऊर्जा आकर्षित होते.

जर तुमच्यासोबतही असे घडले की, कमाई करूनही पैसे उरले नाहीत किंवा खर्च जास्त झाला तर त्याचे एक कारण वास्तुदोष असू शकते. त्यामुळे या चुकांकडे वेळीच लक्ष देण्याची गरज आहे. अन्यथा मोठ्या दुष्परिणामांना सामोरे जावे लागू शकते.

# डिहायड्रेशन टाळण्यासाठी उन्हाळ्याच्या आहारात करा या पदार्थांचा समावेश

उन्हाळ्यात उष्माघात आणि डिहायड्रेशनची समस्या सामान्य आहे. हे टाळण्यासाठी, हायड्रेटेड राहण्याचा सल्ला दिला जातो. या ऋतूमध्ये शरीर थंड ठेवण्यासाठी तुम्ही तुमच्या आहारात अनेक प्रकारच्या पदार्थांचा समावेश करू शकता. जे खाल्ल्याने रोगप्रतिकार शक्ती मजबूत होते. उन्हाळ्यात होणार्–या अनेक गंभीर समस्याही तुम्ही टाळू शकता. चला तर मग जाणून घेऊया, उन्हाळ्यात कोणते पदार्थ खाणे खूप गरजेचे आहे.





### बेल :

उन्हाळी हंगामातील हे सर्वोत्तम फळ आहे. वेलीमध्ये अनेक प्रकारचे पोषक घटक आढळतात, त्यात व्हिटॅमिन–सी, प्रोटीन, बीटा कॅरोटीन मुबलक प्रमाणात असते. जे अनेक आजारांपासून संरक्षण करण्यास मदत करते. याशिवाय ते शरीराला थंड ठेवते. म्हणूनच तुम्ही तुमच्या आहारात भोपळी मिरचीचा समावेश केला पाहिजे.

### तुळशीच्या बिया :

तुळशीच्या बिया आरोग्यासाठी वरदानापेक्षा कमी नाहीत. उन्हाळ्यात या बियांचे सेवन केल्यास शरीरावर थंडावा निर्माण होतो. या बिया तुम्ही लिंबूपाणी, सरबत किंवा रसात वापरू शकता.

### ताक :

काळे मीठ, हिंग आणि जिरे पावडरपासून बनवलेले ताक अतिशय चवदार आणि आरोग्यासाठी परिपूर्ण असते. उन्हाळ्यात पचनक्रिया सुरळीत ठेवायची असेल तर जेवल्यानंतर ताक अवश्य प्या. शरीराला थंड ठेवण्यासोबतच पचनासाठी खूप ायदेशीर आहे.

### नारळ पाणी :

उष्माघात टाळण्यासाठी नारळाचे पाणी नियमित प्यावे. यामुळे शरीराला हायड्रेट ठेवण्यासोबतच उष्णतेपासून आराम मिळतो.

### काकडी :

काकडीत पाणी मुबलक प्रमाणात आढळते. उन्हाळ्यात तुम्ही ते अनेक प्रकारे वापरू शकता. तुम्ही तुमच्या आहारात काकडीचा रस, रायता आणि थंड सूपचा समावेश करू शकता.

### बडीशेप बियाणे :

एका जातीची बडीशेप शरीराला थंड ठेवण्यासाठी देखील उपयुक्त आहे. त्याचा वापर करून तुम्ही थंड पेय बनवू शकता. तुम्ही एका जातीची बडीशेप बियापासून सरबत बनवू शकता, ज्यामुळे उष्णता कमी होण्यास मदत होते.

### द्राक्ष :

उन्हाळ्यात मिळणारे हे रसाळ आणि स्वादिष्ट फळ आहे. जे अँटिऑक्सिडंटस आणि आवश्यक पोषक तत्वांनी परिपूर्ण आहे. द्राक्षे त्वचेला उन्हापासून वाचवण्यासही मदत करतात.

### लीची :

लोकांना उन्हाळ्यात लिची खायला आवडते. यामध्ये अँटिऑक्सिडंटस, पोटॅशियम, मॅग्नेशियम आणि व्हिटॅमिन–सी सारख्या घटकांचा समावेश आहे. जे आरोग्यासाठी खूप फायदेशीर असतात.

### आंबा :

आंबा हा आरोग्याचा खजिना आहे. यात अनेक आवश्यक पोषक घटक असतात. हे रोगप्रतिकारक शक्ती सुधारते. ज्याद्वारे तुम्ही अनेक आजारांपासून दूर राहू शकता. याशिवाय उष्माघातापासून बचाव करण्यासाठीही हे उपयुक्त आहे.

### पुदीना पाने :

उन्हाळ्यात ही पाने शरीराला थंड ठेवतात. तुम्ही ते वापरून पेय बनवू शकता किंवा स्वादिष्ट पुदिन्याच्या चटणीचा आस्वाद घेऊ शकता.

# पाच विधानसभा मतदारसंघात पोटनिवडणूक, निवडणूक आयोगाची घोषणा



नवी दिल्ली : पाच विधानसभा मतदारसंघात पोटनिवडणूक होणार आहे. निवडणूक आयोगाने प्रसिद्धीपत्रक काढून ही घोषणा केली आहे. गुजरातमधील दोन तर केरळ, पंजाब आणि पश्चिम बंगालमधील प्रत्येकी एका विधानसभा मतदारसंघात पोटनिवडणूक होणार आहे.

गुजरातमध्ये करसनभाई पंजाभाई सोलंकी यांच्या निधनामुळे रिक्त झालेल्या कडी (एससी) तसेच भायनी भूपेंद्रभाई गंधूभाई यांच्या राजीनाम्यामुळे रिक्त झालेल्या विसावदर येथे पोटनिवडणूक होणार आहे. केरळमध्ये पीव्ही अन्वर यांच्या राजीनाम्यामुळे रिक्त झालेल्या निलांबूरमध्ये पोटनिवडणूक होणार आहे. गुरप्रीत गोगी बस्सी यांच्या निधनामुळे रिक्त झालेल्या पंजाबच्या लुधियाना पश्चिम येथे पोटनिवडणूक होणार आहे. नसिरुद्दीन अहमद यांच्या निधनामुळे रिक्त झालेल्या पश्चिम बंगालमधील कालीगंज येथे पोटनिवडणूक होणार आहे.

पोटनिवडणुकीची अधिसूचना २६ मे रोजी जारी केली जाईल. उमेदवारी अर्ज दाखल करण्याची शेवटची तारीख २ जून आहे आणि अर्जांची छाननी ३ जून रोजी होईल. उमेदवारी अर्ज मागे घेण्याची शेवटची तारीख ५ जून आहे. मतदान १९ जून रोजी होईल. मतमोजणी २३ जून रोजी होईल.

# तुमच्या मोठ्या आतड्यांना कर्करोगाचा धोका; काय आहे 'कोलोरेक्टल कॅन्सर'? तज्ज्ञ सांगतात...

कर्करोग म्हटले तर आपल्या अंगावर काटा आल्यावाचून राहत नाही, कारण हा एक असा रोग आहे. त्याचे वेळीच निदान नाही केले तर आपल्या जीवावर बेतू शकतो. सध्या जगभरात कॅन्सरची प्रकरणे वेगाने पसरत आहेत. कर्करोगाचे तसे बरेच प्रकार आहेत. पण आता यापैकी कोलोरेक्टल किंवा कोलन कॅन्सरचे नाव पुढे येत आहे. हा कर्करोग मोठ्या आतड्यांचा कर्करोग म्हणून ओळखला जातो. कोलोरेक्टल किंवा कोलन कॅन्सर म्हणजे नेमकं काय? याची लक्षणे आणि कारणे काय आहेत? याबाबत सविस्तर माहिती देत आहेत रेडिएशन ऑन्कोलॉजिस्ट डॉ. अभिषेक पुरकायस्थ, ते तळेगावातील टीजीएच– ऑन्को–लाई फ कॅन्सर सेंटरमधील एक नामांकित डॉक्टर आहेत. जाणून घ्या त्यांनी काय म्हटलंय?

**मोठ्या आतड्याचा कॅन्सर : काय आहेत लक्षणे आणि कारणे, डॉक्टर सांगतात**...कोलोरेक्टल म्हणजेच मोठ्या आतड्याचा कॅन्सर हा मोठे आतडे किंवा गुदाशयात उद्‌भवतो. कोलन किंवा गुदाशयच्या आतील अस्तरावरील पेशींचा एक छोटा समूह कालांतराने कर्करोगात विकसित होऊ लागतो. ज्यानंतर कर्करोगाचा धोका उद्‌भवतो. डॉक्टर सांगतात, मोठ्या आतड्याचा कर्करोग हा कोलोनोस्कोपी सारख्या नियमित तपासणीद्वारे टाळता येतो.

### मोठ्या आतड्याच्या कॅन्सरची कारणे

फॅमिलीअल एडेनोमॅटस पोलीपोसिस (एफएपी), लिंच सिंड्रोम, गार्डनर्स सिंड्रोम असे या कर्करोगाचे प्रकार आहेत. मोठ्या आतड्याच्या कॅन्सरमध्ये आनुवंशिकता ही महत्त्वाची भूमिका बजावते. उच्च चरबीयुक्त आहार, आहारात हिरव्या भाज्यांच्या सेवनाची कमतरता, विशेषत : स्मोक्ड किंवा जळलेल्या लाल मांसाचा जास्त वापर, शारीरिक हालचालींचा अभाव, लठ्ठपणा, धूम्रपान आणि मद्यपान यासारखे जीवनशैली घटक मोठ्या आतड्याच्या कर्करोगास कारणीभूत ठरतात. या प्रकारच्या कर्करोगाच्या विकासामध्ये वय महत्त्वपूर्ण भूमिका बजावते, 50 वर्षांपेक्षा जास्त वयाच्या व्यक्तींना जास्त धोका असतो. अभ्यासातून असे दिसून आले आहे की, या कर्करोगाची लागण होताच आतड्याच्या जैविक असंतुलनामुळे दीर्घकाळ जळजळ होऊ शकते. आतड्यांसंबंधी अस्तरांना नुकसान होऊ शकते, ज्यामुळे मोठ्या आतड्याच्या कर्करोगाची संभाव्यता वाढते. संशोधनानुसार, वायू प्रदूषण आणि काही रसायनांच्या



संपर्कात येण्यासारखे पर्यावरणीय घटक देखील मोठे आतडे आणि गुदाशय मध्ये कर्करोगाच्या वाढीस चालना देण्यासाठी भूमिका बजावू शकतात. ही वैविध्यपूर्ण कारणे समजून घेतल्याने मोठ्या आतड्याच्या कर्करोगासाठी प्रतिबंधक धोरणे आणि वेळीच निदानास मदत होऊ शकते.

### हा कॅन्सर एक सायलेंट किलर

● मोठ्या आतड्याचा कॅन्सर हा सायलेंट किलर आहे. ज्याच्या सुरुवातीच्या टप्प्यात कोणतीही लक्षणे दिसत नाहीत. हा रोग जसजसा वाढतो तसतसे काही लक्षणे दिसू शकतात.

● आतड्यांच्या सवयींमध्ये सतत होणारे बदल, आतड्याच्या बदललेल्या सवयी जसे की अतिसार किंवा बद्धकोष्ठता, तसेच शौचावाटे रक्त येणे किंवा गुदाशयातील रक्तस्त्राव याचा अर्थ मोठ्या आतड्याचा कर्करोग होऊ शकतो.

● अचानक वजन कमी होणे आणि सतत थकवा ही देखील सामान्य लक्षणे आहेत ज्याकडे दुर्लक्ष केले जाऊ नये.

● मोठ्या आतड्याचा कॅन्सर असलेल्यांना ओटीपोटात वेदना किंवा अस्वस्थता, पोट फुगणे आणि शौचास जाऊ आल्यानंतरही पूर्णत : मल विसर्जन न झाल्याचे तक्रार जाणवते.

● मलविसर्जनातील बदलाकडे त्वरित लक्ष देणे आवश्यक आहे. कारण तो मोठ्या आतड्याच्या कर्करोगाचे लक्षण असू शकते.

● या लक्षणांकडे वेळीच लक्ष देणे आणि ते दीर्घकाळ टिकून राहिल्यास तज्ज्ञांचा सल्ला घेणे गरजेचे आहे.

● कोलोरेक्टल कॅन्सर असलेल्या रूग्णांचे परिणाम सुधारण्यासाठी वेळीच तपासणी आणि उपचार महत्त्वपूर्ण भूमिका बजावतात.

### उपचार काय आहेत?

डॉक्टर सांगतात, या कर्करोगाची वैविध्यपूर्ण कारणे समजून घेतल्याने प्रतिबंधक धोरणे आणि वेळीच निदानास मदत होऊ शकते. याच्या उपचारात शस्त्रक्रिया, केमोथेरपी, रेडिएशन थेरपी आणि टार्गेटेड थेरपी यांचा समावेश आहे. तुमचे डॉक्टर तुमच्यासाठी योग्य उपचार पद्धती ठरवतील. नियमित कोलोनोस्कोपी किंवा इतर शिारस केलेल्या तपासणी केल्याने कोलोरेक्टल कर्करोग त्याच्या सुरुवातीच्या टप्प्यात शोधण्यात मदत होऊ शकते. मृत्यूदर कमी करण्यासाठी आणि या प्राणघातक कर्करोगाने प्रभावित झालेल्या व्यक्तींकडे पाहण्याचा दृष्टीकोन वाढवण्यासाठी हे सक्रिय धोरण महत्त्वाचे आहे. असं डॉक्टर सांगतात.

सांज दैनिक बीड वास्तव
सायं. दैनिक बीड वास्तव हे पत्र **मालक, मुद्रक, प्रकाशक जितेंद्र कान्होजीराव सिरसाट** शुभेच्छा प्रिंटिंग प्रेस एमआयडिसी. बीड –४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून बीड वास्तव ऑफिस बशीर गंज चौक, बीड ४३११२२ (महाराष्ट्र) येथून प्रसिद्ध केले. **संपादक – जितेंद्र कान्होजीराव सिरसाट, निवासी संपादक –अरविंद ओव्हाळ** (या अंकामध्ये छापलेल्या मजकूराशी मालक संपादक प्रकाशक सहमत असतीलच असे नाही) (वाद–विवाद बीड न्याय कक्षेत) मो. 9022952922

## कविता....

• ॲड शितल सत्वधर
9975162127




# वांग आल्यामुळे चेहरा काळा पडला आहे? डाग घालवण्यासाठी आयुर्वेदातील 'या' काडीचा करा वापर!

त्वचेसंबंधित समस्यांपासून आराम मिळवण्यासाठी केमिकल उपाय न करता घरगुती उपाय करावे . पिगमेंटेशन वाढू लागल्यानंतर त्वचा स्वच्छ करण्यासाठी जेष्ठमध वापरावे . चला तर जाणून घेऊया जेष्ठमध वापरण्याची योग्य पद्धत .

सर्वच महिलांना सुंदर आणि चमकदार त्वचा हवी असते . पण वयाच्या चाळिशीनंतर महिलांच्या त्वचेवर वांग, काळे डाग, सुरकुत्या, बारीक रेषा इत्यादी समस्या उद्भवण्यास सुरुवात होते . या समस्या उद्भवू लगल्यानंतर त्वचा निस्तेज आणि रुक्ष होऊन जाते .

महिलांच्या त्वचेवर वांग आल्यानंतर गालावर काळे डाग दिसण्यास सुरुवात होते . सुरुवातीच्या दिवसांमध्ये हे डाग कमी दिसतात, मात्र कालांतराने यात वाढ झाल्यानंतर चेहऱ्यावर आलेले डाग आणखीनच गडद होत जातात . त्यामुळे त्वचेसंबंधित समस्या उद्भवू लागल्यानंतर योग्य वेळी लक्ष देऊन उपचार करावे . धावपळीची जीवनशैली, खाण्यापिण्याच्या सवयींमध्ये होणारे बदल, अपुरी झोप, पिग्मेंटेशन, टॅनिंग इत्यादी सामान्य समस्या असून या समस्या वाढू लागल्यानंतर त्वचा पूर्णपणे खराब होऊन जाते . त्यामुळे आज आम्ही तुम्हाला चेहऱ्यावर आलेले पिग्मेंटेशन आणि वांग घालवण्यासाठी काही घरगुती उपाय सांगणार आहोत . हे उपाय नक्की करून पहा .

### चेहऱ्यावर पिग्मेंटेशन कशामुळे येते?

त्वचेवर पिग्मेंटेशन आल्यानंतर त्वचेचा रंग काळा आणि गडद होत जातो . ज्यामुळे त्वचा निस्तेज आणि कोरडी दिसू लागते . मेलानिनच्या असंतुलनामुळे त्वचेचा रंग बदलण्यास सुरुवात होते .

- सूर्यप्रकाशाचा दीर्घकाळ संपर्क
- शरीरातील हार्मोनल बदल
- चुकीचा आहार आणि कमी पाण्याचे सेवन करणे
- प्रदूषण आणि त्वचेवरील ताण

### ज्येष्ठमध वापल्यामुळे त्वचेला होणारे फायदे:

आयुर्वेदामध्ये त्वचेसंबंधित समस्यांपासून आराम मिळवण्यासाठी जेष्ठमध वापरण्याचा सल्ला देण्यात आला आहे . ज्येष्ठमधमध्ये ग्लॅब्रिडिन नावाचा घटक आढळून येतो, ज्यामुळे चेवरील डाग, टॅनिंग आणि त्वचेचा रंग सुधारण्यास मदत होते . शिवाय जेष्ठमधमध्ये ॲंटी–इन्फ्लेमेटरी आणि ॲंटीऑक्सिडंट गुणधर्म आढळून येतात, ज्यामुळे त्वचा स्वच्छ आणि निरोगी राहते . त्वचेसाठी जेष्ठमध वापरल्यामुळे त्वचेवरील कमी होतात, त्वचा मऊ आणि सुंदर होते, टॅनिंग दूर होऊन त्वचा उजळण्यास मदत होते, त्वचेवरील दाह कमी होतो इत्यादी अनेक फायदे होतात .





### जेष्ठमधाचा वापर कसा करावा:

- ज्येष्ठमध पावडर
- मध
- गुलाब पाणी

### कृती:

- वांग घालवण्यासाठी सर्वप्रथम वाटीमध्ये जेष्ठमध पावडर घेऊन त्यात मध आणि गुलाब पाणी मिक्स करावे .
- यात सर्व साहित्य सम प्रमाणात घालावे . तयार केलेले मिश्रण संपूर्ण त्वचेवर व्यवस्थित लावून झाल्यानंतर २० मिनिटं ठेवून नंतर पाण्याने त्वचा स्वच्छ करावी . हा उपाय केल्यामुळे त्वचेवरील डाग निघून जाण्यास मदत होईल .

### नैसर्गिक उपाय करताना कोणती काळजी घ्यावी:

- त्वचेसंबंधित समस्यांपासून आराम मिळवण्यासाठी केमिकल उपाय करण्याऐवजी घरगुती उपाय करावे . यामुळे त्वचा नैसर्गिकरित्या चमकदार होते . पण घरगुती उपाय करताना त्वचेची योग्य ती काळजी घ्यावी . त्वचेला सूट न होणाऱ्या पदार्थांचा वापर करू नये . शिवाय कोणताही उपाय करताना सगळ्यात आधी पॅच टेस्ट करून पाहावी . यामुळे कोणता पदार्थ त्वचेला सूट होतो आणि नाही हे समजून येईल .

## वृषभ, सिंह, तूळ, कुंभ राशीसह इतर राशींसाठी आजचा दिवस कसा असेल

### धनु रास

● पान ४ वरून . . . उद्याचा दिवस तुमच्यासाठी सामान्य असेल . तुम्हाला तुमच्या विरोधकांपासून सावध राहावे लागेल . अनावश्यक अडचणीत पडणे टाळावे आणि स्वत :च्या कामात लक्ष द्यावे . जर तुम्ही दुसऱ्यांच्या बाबतीत ढवळाढवळ केली तर तुम्ही अडचणीत येऊ शकता . जर तुमच्या तब्येतीत काही बिघाड झाला असेल तर उद्या ती सुधारेल . कुटुंबातील सदस्यांकडून अपेक्षित सहकार्य मिळू शकेल . एखादा जुना मित्र खूप दिवसांनी तुम्हाला भेटायला येऊ शकतो . उद्या तुम्ही कामाच्या ठिकाणी एक संघ म्हणून काम कराल आणि उद्या तुम्हाला त्याचा फायदा होईल .

### मकर रास

उद्याचा दिवस तुमच्यासाठी गोंधळात टाकणारा असू शकतो . तुमचे मन एखाद्या गोष्टीबद्दल चिंतेत असेल . कुटुंबातील एखाद्या सदस्याकडून तुम्हाला काही चांगली बातमी ऐकायला मिळू शकते . उद्या तुम्ही तुमच्या कामाच्या व्यवसायात काही बदल कराल परंतु उद्या कोणतेही धोकादायक पाऊल उचलू नका . उद्या तुम्हाला तुमच्या बोलण्यावर नियंत्रण ठेवावे लागेल, अन्यथा तुमचा प्रियकर एखाद्या गोष्टीने नाराज होऊ शकतो . तुम्हाला काही कामासाठी थोडे अंतर प्रवास करावे लागू शकते . मुलांच्या लग्नातील अडथळे दूर होतील .

### कुंभ रास

कन्या राशीच्या लोकांसाठी उद्याचा दिवस चांगला राहणार आहे . व्यवसायात, तुम्हाला मागील योजनांमधून चांगले फायदे मिळू शकतात, ज्यामुळे तुम्हाला आनंद होईल . जर तुमचे कोणतेही प्रलंबित काम तुम्हाला बऱ्याच काळापासून त्रास देत असेल तर तेही पूर्ण होऊ शकते . जर तुम्हाला कोणत्याही शारीरिक समस्येमुळे त्रास झाला असेल तर तुम्हाला त्यातही आराम मिळत असल्याचे दिसून येते . विद्यार्थ्यांना शिक्षणात येणाऱ्या समस्यांबद्दल त्यांच्या शिक्षकांशी बोलावे लागू शकते . ज्येष्ठांचे मार्गदर्शन तुमच्यासाठी फायदेशीर ठरेल .

### मीन रास

मीन राशीसाठी उद्याचा दिवस चैनीच्या वस्तूंमध्ये वाढ आणणारा आहे . तुम्ही तुमच्या आयुष्यात एक मोठा निर्णय घेऊ शकता आणि वरिष्ठ सदस्य तुमच्या बोलण्याने खूश होतील . तुमच्या जोडीदाराकडून तुम्हाला भेटवस्तू मिळू शकते . तुमच्या पालकांच्या आशीर्वादाने तुम्ही उद्या यशाकडे वाटचाल कराल . उद्या व्यवसायात तुमची कमाई चांगली असेल . नोकरी करणाऱ्या लोकांवर कामाचा ताण जास्त असेल, परंतु तरीही वरिष्ठांच्या मदतीने ते वेळेवर काम पूर्ण करतील . वैवाहिक जीवन तुमच्या जोडीदाराची तब्येत ठीक नसेल तर उद्या ती सुधारेल .

( टीप – ही माहिती अभ्यासानुसार देण्यात आली आहे . या लेखातील सर्व माहिती ही वाचनासाठी असून ती तंतोतंत लागू होईल असं नाही . सामान्य ज्ञानासाठी ही माहिती वाचण्यात यावी . )

## युवासेना कार्याध्यक्ष पूर्वेश सरनाईक यांच्या मार्फत बीडच्या चार निष्ठावंत युवासैनिकांना स्कॉर्पिओ गाडी भेट

● पान १ वरून . . . असलेले चार युवासैनिक यांचे चांगले कार्यपाहून त्यांना युवासेना कार्याध्यक्ष पूर्वेशजी सरनाईक यांच्यामार्फत चार स्कॉर्पिओ गाड्या भेट देण्यात आल्या आहेत . गाड्या भेट देताना प्रमुख उपस्थितीत राज्याचे सामाजिक न्याय मंत्री मा . संजयजी शिरसाट साहेब, हर्षदाताई सिरसाट, तसेच युवा सेना मराठवाडा निरीक्षक बाजीराव दादा चव्हाण साहेब, यांच्या उपस्थितीत बीडच्या चार निष्ठावंत कार्यकर्त्यांना स्कॉर्पिओ गाड्या आज भेट देण्यात आल्या आहेत . यावेळी उपस्थित बीड जिल्हा शिवसेना जिल्हाप्रमुख अनिल जगताप, जिल्हाप्रमुख सचिन मूळूक, जिल्हाप्रमुख स्वप्नील गलधर, युवासेना मराठवाडा निरीक्षक आरोग्यदूत बाजीराव ( दादा ) चव्हाण तसेच युवा सेना मराठवाडा निरीक्षक अविनाश जाधव, युवा नेते सुरज चुंगडे, मा . युवासेना जिल्हाप्रमुख सुमित कोळपे, मा युवासेना जिल्हाप्रमुख अजय सुरवसे, तसेच सर्व शिवसेना पदाधिकारी, शिवसैनिक, युवासैनिक उपस्थित होते .


## वैष्णवी हगवणेच्या मारेकऱ्यांना कठोर शिक्षा द्या - रत्नमाला मोटे

● पान १ वरून . . . पत्रकाद्वारे सांगितले आहे . तसेच ते म्हणाले की वैष्णवी हगवणे प्रकरणा नंतर मुलींन मध्ये भिती निर्माण झाली आहे . हुंडा मागणाऱ्या भिकारी लोकांनी मुलगी देवु नये कारण मुलीला जन्म देऊन लहानाचं मोठं करायचं, त्याला शिकवायच अन् लग्न करुन देताना मुलाकडील गाडी, सोनं, पैसा हा हुंडा देऊन लग्न करुन द्यायच यासाठी मुलीचा बाप आयुष्यभराची कमाई हसत हसत संपवून टाकतो . यामागे त्याचा एकच उद्देश असतो मुलगी खुश रहावी, स्थळ चांगले असेल तर तो हे सर्व विसरुन जातो . पण काही लालची कर्मदरिद्रीपणा असलेले हगवणे सारखे पाहुणे मिळाले की, बिचारा गळून पडतो . आधीच त्यांने सर्व संपविले असते अन् नंतर जर सासरच्या मंडळींनी केलेली मागण्या पूर्ण करु शकत नाही म्हणुन अश्या घटना घडतात त्यामुळे शासनाने वैष्णवी हगवणे च्या मारेकऱ्यांना कठोर शिक्षा द्यावी असे गेवराई भाजपा महिला अध्यक्षा रत्नमाला नानी मोटे यांनी प्रसिद्ध पत्रकाद्वारे सांगितले आहे .

## मुक्ता आर्दड शिक्षण रत्न पुरस्काराने सन्मानित ; सर्व स्तरातून होतोय अभिनंदनचा वर्षाव

● पान १ वरून . . . जाणाऱ्या राष्ट्रीय शिक्षण रत्न पुरस्कारासाठी महाराष्ट्र राज्य विनाअनुदानित शाळा कृती समितीच्या मराठवाडा महिला सचिव तथा राष्ट्रवादी महिला कॉंग्रेसच्या गेवराई तालुकाध्यक्षा तसेच श्री संत भगवानबाबा माध्यमिक विद्यालयाच्या शिक्षिका सौ . मुक्ता दिगंबर आर्दड ( मोटे ) मॅडम यांनी शैक्षणिक सामाजिक क्षेत्रातील केलेल्या उल्लेखनीय कार्याबद्दल व शिक्षण क्षेत्रातील विविध प्रश्न सोडविण्यासाठी दिलेला लढा आता पर्यंत केलेले विविध आंदोलन, गोरगरीब विद्यार्थ्यांना केलेली मदत या सर्व बाबींची दखल घेऊन जाहीर करण्यात आला होता . दरम्यान सदर पुरस्काराचे वितरण दि .२० मे २०२५ मंगळवार रोजी मुंबई मराठी पत्रकार भवन आझाद मैदान महानगरपालिका मार्ग मुंबई येथे आयोजित करण्यात आलेल्या शानदार सोहळ्यात सहकार मंत्री ना .बाबासाहेब पाटील, मराठवाडा शिक्षक आमदार विक्रम बप्पा काळे, मा .आ .रामरावजी वडकुते, एकता सेवाभावी संस्थेचे महाराष्ट्र अध्यक्ष अझहर खान,प्रसिद्ध अभिनेत्री पवित्र रिश्ता फेम उषा नाडकर्णी, फिल्म अभिनेता अली खान या मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले . या वेळी सौ . मुक्ता दिगंबर आर्दड ( मोटे ) मॅडम यांना सदरील शिक्षक रत्न पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले . हा पुरस्कार मिळाल्याबद्दल सौ .मुक्ता दिगंबर आर्दड ( मोटे ) मॅडम यांचे राष्ट्रवादी कॉंग्रेसचे प्रदेश सरचिटणीस व मा .आ . श्री अमरसिंह पंडित, जय भवानी शिक्षण संस्थेचे सचिव जयसिंह पंडित व गेवराई विधानसभा मतदारसंघाचे आमदार श्री विजयसिंह पंडित, शारदा क्रिडा अकॅडमीचे संचालक श्री रणवीर काका पंडित व गेवराई तालुक्याचे युवा नेतृत्व श्री पृथ्वीराजे ( बाळ दादा ) पंडित तसेच उत्तरेश्वर शिक्षण संस्थेचे सचिव श्री गोपीनाथ घुले, म .राज्य विनाअनुदानित कृती समितीचे उपाध्यक्ष श्री खंडेराव जगदाळे सर यांच्यासह बीड जिल्हा विनाअनुदानित शाळा कृती समितीचे पदाधिकारी, श्री संत भगवानबाबा माध्यमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी, शारदा विद्या मंदिरचे मुख्याध्यापक श्री राजेंद्र जगदाळे, मुख्याध्यापक मुरलीधर पवार सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांनी अभिनंदन करून त्यांच्या पुढील कार्यासाठी शुभेच्छा दिल्या .

## महा जम्बो शब्दकोडे



### आडवी विधाने

१. देव आनंद, साधना यांचा सुपरहिट चित्रपट
५. मेलेला, ठार
७. मेळ, जुळणी
९. नोकर, सेवक
१०. गळ्यामागील भाग, सत्कार
११. एक हजार किलोचे वजन
१२. राजेश खन्ना, रेखा, राज बब्बर यांचा चित्रपट
१६. शशी कपूर, आशा पारेख यांचा चित्रपट
१८. पोपट, कीर, राघू
२०. सहा धावांचा क्रिकेटमधील फटका
२२. कुबेराचा सेवक
२३. वजनदार
२४. कापरे, थरथर
२५. भारलेला, ताब्यात आलेला
२७. दुर्दशा, वाईट अवस्था
२८. संजय दत्तची प्रभावी भूमिका असलेला चित्रपट
२९. मूषक
३०. किल्ल्याभोवतीची मजबूत भिंत
३१. दानशूर, मोठ्या मनाचा
३३. लाकूड कापण्याचे हत्यार
३५. नूतन, नवा
३६. तलवार
३८. कर, हस्त
४१. अभिप्राय
४३. अंगावरील बारीक मऊ केस
४५. खानेसुमारी, शिरगणती
४६. अज, बकरा
४८. शेंगेचे कवच
५०. धरित्री, पृथ्वी
५२. एका पक्ष्याचे नाव
५४. बाण, शर
५५. नाडी, शीर, धमनी
५७. अजगर
५८. पर्वत; जिन्नस
५९. इटलीची राजधानी
६१. सौभाग्यवतीचे संक्षिप्त रूप
६२. मंडप
६३. वडीलभाऊ; विनोद मेहराचा चित्रपट
६४. कोषाध्यक्ष
६७. दुःख, वेदना
६८. झाड, वृक्ष
६९. बकऱ्याचे कमावलेले कातडे
७१. युद्ध, रण
७३. दोरी, दोर
७५. सफेद, पांढरा
७७. जमिनीवर अंथरण्याचे जाडजूड बिछाईत
८०. लोणी
८१. अवहेलना, मानखंडना
८२. धर्मेंद्र-जीतेंद्र जोडीचा हिट चित्रपट

### उभी विधाने

१. उत्तर कुमार, शर्मिला टागोर यांचा चित्रपट
२. वर्ष, साल
३. नाटक-सिनेमात काम करणारा पुरुष
४. सोने, सुवर्ण
५. हरिणाच्या डोळ्यांसारखे डोळे असलेली सुंदर स्त्री
६. होडी, मचवा, नाव
७. मोर्चेबांधणी, एकत्र करणे
८. प्रतिबंध, बंदी ( हिंदी )
९. 'शुक्रतारा' हा कार्यक्रम सादर करणारे गायक - अरुण **
१२. अभिनय, नट्टाफट्टा
१३. पक्ष्याच्या डोक्यावरील शेंडी
१४. यज्ञ, यजन
१५. गगन, नभ
१७. योग्य निर्णय, निवाडा
१९. मडक्याचा तुकडा
२१. ताजा, प्रफुल्लित
२४. फाणस, लालटेन
२६. नाराज, निराश
२८. कळलाव्या; ब्रह्मदेवाचा मानसपुत्र
३०. शरीर - अंतःकरण-पैसा इत्यादी सर्वस्व
३२. फाशांवरून शकुन पाहण्याची विद्या
३४. तृष्णा
३७. अंत, अखेर, समाप्ती
३९. धट्टाकट्टा, मजबूत, बळकट
४०. श्वापद, पशू
४२. तोटा, हानी
४४. राजेश खन्ना, शर्मिला टागोर, फिरोज खान यांचा चित्रपट
४७. भीती, भय
४९. एक हिंदी अभिनेत्री - **
अग्निहोत्री
५१. गायन म्हणण्याची विशिष्ट धाटणी, शैली
५३. भारताच्या पहिल्या महिला राज्यपाल - **** नायडू
५६. परस्परांपासून सारख्या अंतरावर असलेला
५७. आमंत्रण, बोलावणे
६०. अंतःकरण
६५. नोकर, सेवक
६६. अरबी वर्षाचा नववा महिना
६९. नेत्र, डोळे
७०. आर्थिक सामर्थ्य
७२. धुळीचा कण, रेणू
७४. मुस्लिमांचा नमस्कार
७५. पती, मालक, कारभारी
७६. कढवलेले लोणी
७८. मकरंद
७९. पराक्रमी, लढवय्या

### महा जम्बो शब्दकोडे कालचे उत्तर

| | | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| व | सं | त | का | ने | ट | क | र | | धु | | टो | क | दा | र |
| सा | ग | र | | म | | स | ई | प | रां | ज | पे | | दा | स |
| | न | | द | | वा | र | स | | डे | रा | | लू | | वं |
| अ | म | री | श | पु | री | | | म | | सं | क | ट | | ती |
| ना | त | | र | त | | चौ | क | शी | | ध | | मा | घ | |
| थ | | र | थ | | मा | का | | द | र | | खा | र | | क |
| | मो | द | | क | ल | र | व | | वा | ट | प | | त | म |
| मे | ह | न | त | | व | | जी | व | न | | र | ख | वा | ला |
| ह | र | | | क | ण | ख | र | | गी | त | | रू | | |
| बू | | स | व | ड | | प | | उ | | ग | र | ज | वं | त |
| ब | र | खा | स्त | | रा | | उ | दा | ह | र | ण | | श | र |
| | त्न | | रा | ज | धा | नी | | स | ल | | जी | व | | बे |
| न | मा | ज | | म्म | | ल | ग्न | | का | | त | र | बे | ज |
| क | ला | का | र | | ना | म | | भी | | अ | | पा | | |
| ली | | त | ग | म | ग | | स | म | ज | दा | र | | शो | ध |



## वृषभ, सिंह, तूळ, कुंभ राशीसह इतर राशींसाठी आजचा दिवस कसा असेल, जाणून घ्या

आजचा दिवस काही राशीच्या लोकांसाठी विशेष असणार आहे. मेष, वृषभ, मिथुन, कर्क, सिंह, कन्या यासह सर्व राशींसाठी खास आहे. सर्व राशीच्या लोकांसाठी आजचा दिवस कसा असेल जाणून घ्या

### मेष रास

मेष राशीच्या लोकांसाठी उद्याचा दिवस गोंधळात टाकणारा असेल. तुम्हाला विनाकारण खूप धावपळ करावी लागेल, ज्यामुळे तुमचे मन अस्वस्थ होईल. काही काम पूर्ण न झाल्यामुळे तुम्ही निराश व्हाल, परंतु तुम्हाला तुमच्या बोलण्यात आणि वागण्यात संयम ठेवावा लागेल, अन्यथा समस्या उद्‌भवू शकते. जर तुमच्या मालमत्तेशी संबंधित कोणताही खटला न्यायालयात सुरू असेल तर उद्या या प्रकरणात तुमच्या बाजूने निकाल लागेल. तुम्ही तुमच्या विरोधकांवर विजय मिळवाल. राजकारणात काम करणाऱ्या लोकांना मोठे पद आणि आदर मिळू शकतो. जर कुटुंबात परस्पर मतभेद असतील तर ते सोडवले जाऊ शकतात.

### वृषभ रास

वृषभ राशीच्या लोकांसाठी उद्याचा दिवस आरोग्याच्या दृष्टीने कमकुवत राहणार आहे, म्हणून तुम्हाला तुमच्या आरोग्याकडे दुर्लक्ष करणे टाळावे लागेल. तुम्ही नवीन व्यवसाय सुरू करू शकता, परंतु उद्या भागीदारीच्या कामात अडचणी येण्याची शक्यता आहे, म्हणून उद्यापासून भागीदारीचे काम सुरू करू नका. तुमचे मन एखाद्या गोष्टीबद्दल चिंतेत असेल. सामाजिक आणि राजकीय क्षेत्रात काम करणाऱ्या लोकांनी काही मोठ्या फसवणुकीपासून सावध राहण्याची गरज आहे. तुम्हाला भूतकाळातील काही चुकांमधून धडा घ्यावा लागेल आणि तुमच्या भावनांवर नियंत्रण ठेवावे लागेल. कामाच्या संदर्भात तुमचा प्रवास उद्या यशस्वी होईल.

### मिथुन रास

मिथुन राशीसाठी उद्याचा दिवस खूप शुभ राहणार आहे. तुम्हाला नवीन वाहन मिळू शकते. तुम्ही तुमच्या कुटुंबातील सदस्यांसह कोणत्याही शुभ समारंभात सहभागी होऊ शकता. मुलांशी तुमचा चांगला समन्वय असेल आणि तुम्ही त्यांच्या शिक्षणात त्यांना पाठिंबा द्याल. तुमच्यासाठी नवीन कामात गुंतवणूक करणे चांगले राहील. तुमच्या मनात असलेल्या समस्यांबद्दल तुम्ही वरिष्ठ सदस्यांशी बोलू शकता आणि त्यांच्याकडून तुम्हाला योग्य उपाय मिळतील. आईचा कोणताही जुना आजार पुन्हा उद्‌भवू शकतो ज्यामुळे त्रास होईल. खूप दिवसांनी जुना मित्र भेटून तुम्हाला आनंद होईल. तुम्ही शेअर बाजार आणि सट्टेबाजीमध्ये पैसे गुंतवू शकता.

### कर्क रास

कर्क राशीच्या लोकांसाठी उद्याचा दिवस कायदेशीर बाबींमध्ये चांगला राहणार आहे. तुम्हाला उत्पन्नाचे नवीन स्रोत मिळतील. कुटुंबातील लोक तुमच्या शब्दांचा आदर करतील, ज्यामुळे तुम्ही समाधानी राहाल आणि काहीतरी खास करण्याची इच्छा प्रबळ राहील. उद्या तुम्ही तुमच्या कुटुंबाच्या आनंदासाठी काही भौतिक वस्तू खरेदी करू शकता. कोणत्याही अनोळखी व्यक्तीच्या प्रभावात येऊ नका, अन्यथा तो तुम्हाला फसवू शकतो. व्यवहारांशी संबंधित कोणतीही बाब तुमच्यासाठी मानसिक त्रास निर्माण करू शकते. तुमच्या मुलांकडून काही चांगली बातमी मिळू शकते. तुम्हाला काही कामासाठी कमी अंतराच्या प्रवासाला जावे लागू शकते.

### सिंह रास

सिंह राशीच्या लोकांसाठी उद्याचा दिवस अचानक लाभदायक असेल. पण उद्या गाडी चालवताना त्यांना काळजी घ्यावी लागेल कारण दुखापत आणि अपघात होण्याची शक्यता आहे. व्यवसायात कोणासोबतही भागीदारीत कोणताही करार करू नका, अन्यथा तुमची फसवणूक होऊ शकते, असा सल्ला दिला जातो. तुम्हाला एखाद्या गोष्टीची काळजी असेल. जर तुम्हाला कोणतेही नवीन काम सुरू करायचे असेल तर ते तुमच्यासाठी चांगले राहील. जर तुमच्या भावा-बहिणींसोबत कोणत्याही गोष्टीवरून वाद सुरू असेल तर तो मिटेल आणि तुमचे नाते सुधारेल.

### कन्या रास

कन्या राशीच्या लोकांसाठी उद्याचा दिवस तुमच्यासाठी थोडा गोंधळात टाकणारा असेल. मानसिक अस्वस्थतेमुळे तुम्हाला निर्णय घेण्यात अडचण येईल. परस्पर भांडणांमुळे कुटुंबातील वातावरण बिघडू शकते. तुमच्या मनात एखाद्या गोष्टीची भीती असेल, ज्यामुळे तुम्ही चिंतेत राहाल. उद्या एखाद्या स्पर्धेत यश मिळाल्याने विद्यार्थ्यांना आनंद होईल. प्रेम जीवनाच्या बाबतीत दिवस उत्साहवर्धक असेल. तुमच्या मुलांकडून काही चांगली बातमी ऐकायला मिळू शकते. तुम्हाला काही कामासाठी कमी अंतराच्या प्रवासाला जावे लागू शकते.

### तूळ रास

उद्या, सोमवार तूळ राशीसाठी फायदेशीर राहील आणि आदर वाढेल. तुम्हाला वाहनाचे सुख मिळेल, जे लोक वाहन खरेदी करण्याचा विचार करत आहेत त्यांच्यासाठी उद्याचा दिवस या बाबतीत अनुकूल असेल. कुटुंबातील एखाद्या सदस्याला तुम्ही बोललेल्या गोष्टीबद्दल वाईट वाटू शकते, ज्यामुळे तो रागावू शकतो. तुमच्या अभ्यासाशी संबंधित काही प्रकरणे सोडवली जात आहेत असे दिसते. खूप दिवसांनी जुना मित्र भेटून तुम्हाला आनंद होईल. जर तुम्ही तुमच्या जोडीदारापासून काही गोष्टी लपवून ठेवल्या असतील तर त्या तुम्हाला उघड होऊ शकतात, म्हणून तुम्ही स्वत: त्याला सर्व काही सांगितले तर बरे होईल. नवीन मालमत्ता खरेदी करण्याचे तुमचे स्वप्न पूर्ण होईल.

### वृश्चिक रास

वृश्चिक राशीचे राशीचे उद्या तुमच्यासाठी प्रगतीचा मार्ग मोकळा करेल. व्यवसायात नफा मिळाल्यानंतर तुम्ही आनंदी व्हाल. एखाद्याकडून ऐकलेल्या गोष्टीवरून वाद घालू नका, अन्यथा तुमचे नुकसान होऊ शकते. पैशाशी संबंधित कोणताही विषय तुम्हाला त्रास देऊ शकतो. आर्थिक बाबींमध्ये तुम्ही मित्रांकडून सल्ला घेऊ शकता परंतु इतर कोणाच्याही प्रभावाखाली कोणताही निर्णय घेऊ नका अन्यथा तुमचे नुकसान होऊ शकते. विद्यार्थ्यांसाठी उच्च शिक्षणाचा मार्ग मोकळा होईल. नोकरीच्या शोधात असलेल्या लोकांना उद्या यश मिळू शकते. उद्या वैवाहिक जीवनात प्रेम आणि परस्पर सहकार्य असेल. ● पान ३ वर...

# काडीवडगांव क्रं.2 येथील मारुती मंदिराच्या नावे असलेला भूखंड क्र.103 रद्द करा

## ➤ गटविकास अधिकारी यांचे ग्रामपंचायत ला आदेश ➤ राजाभाऊ भिसे यांनी दिली होती तक्रार

माजलगाव / प्रतिनिधी : काडीवडगांव क्र.२ (माजलगाव शहरा लगत) येथिल सनं ७३ मधील भूखंड क्र.१०३ ची आपल्या ग्रामपंचायत च्या अभिलेख्यात असलेली नोंद तसेच सदरील जागेतील मारुती मंदिराच्या नावे असलेली ट्रस्ट रद्द करणे बाबत मुंबई ग्रा.पं.अधिनियम १९५८ मधील तरतुदीनुसार योग्य ती कार्यवाही अनुसरून रद्द करणे बाबतची प्रक्रिया करावी. असे आदेश गटविकास अधिकारी पंचायत समिती वडवणी यांचे पत्र ज्याचा जा.क्रं.६३७ दि. २१/५/२०२५ असा आहे.

या बाबत भिसे राजाभाऊ मरीबा, रा.काडीवडगांव क्र २ ता.वडवणी



राजाभाऊ भिसे

जि.बीड यांचा दि.३१/०१/२०२५ यांच्या तक्रारी अर्जानुसार काडीवडगांव क्र.२ येथिल सनं ७३ मधील भूखंड १०३ ची आपल्या ग्रामपंचायत च्या अभिलेख्यात असलेली नोंद तसेच सदरील जागेतील मारुती मंदिराच्या नावे असलेली ट्रस्ट रद्द करणे बाबत अर्ज दिला. त्यानुसार वरील प्रमाणे गटविकास अधिकारी व्ही.नागरगोजे यांनी संबंधित ग्रामपंचायत अधिकारी यांना दिले. तसेच याबाबत काय कार्यवाही केली त्याचा अहवाल तात्काळ देण्यात यावा.

तसेच याबाबत तक्रारदार यास आपल्या स्तरावरुन परस्पर अवगत करावे व केलेल्या कार्यवाहीचा अहवाल या कार्यालयास सादर करावा. या कामी विलंब होणार नाही याची गांभिर्याने दखल घ्यावी. असे आदेश गटविकास अधिकारी पंचायत समिती वडवणी यांनी संबंधित ग्रापंचायत अधिकारी यांना दिले आहेत.

# कोयाळ येथे सर्पदंशाने सख्या भावंडांचा दुर्दैवी मृत्यू

## ➤ संपुर्ण गावावर शोककळा; ➤ शनिवारी गावात एकाही घरी चुल पेटली नाही







माजलगाव / प्रतिनिधी : विधान सभा मतदार संघातील धारूर तालुक्यातील कोयाळ गावात एक हृदयद्रावक घटना घडली असुन सर्पदंशामुळे एकाच कुटुंबातील सख्या भावंडांचा मृत्यू झाल्याची दुर्दैवी घटना घडली. ही घटना २४ मे रोजी मध्यरात्री ९ ते १० वाजताच्या सुमारास प्रदीप मधुकर मुंडे यांच्या राहत्या घरी घडली. दोघांचाही जागीच मृत्यू झाला असून धारूर ग्रामीण रुग्णालयामध्ये शवीछेदन करण्यात आले आहे. याघटनेने संपुर्ण गावावर शोककळा पसरली असुन, यामुळे शनिवारी दिवसभर गावात एकाही घरी चुल पेटली नाही.

धारूर तालुक्यातील कोयाळ गावामध्ये मुंडे वस्तीवर एका पत्र्याच्या शेडमध्ये प्रदिप मुंडे कुटुंबासह राहत होते.

सध्या मोठ्या प्रमाणावर अवकाळी पाऊस पडत असल्याने व उकाडा होत असल्याने साप गर्मीला निघण्याच्या घटनेमध्ये वाढ झाली आहे. असाच प्रकार मुंडे वस्तीवर घडला. प्रदीप मुंडे यांची सात वर्षांची मुलगी कु. कोमल आणि पाच वर्षांचा मुलगा शिवम हे आपल्या आईवडिलांसोबत रात्री झोपले होते. ते झोपेत असतानाच मध्यरात्री प्रथम कु. कोमलला साप चावला. तीने वडिलांना कांहीतरी चावल्याचे सांगितले. त्यावर तिला दवाखान्यात नेण्याची तयारी करत असतानाच शिवमला ही साप चावला. त्याने साप चावल्याने सांगताच मुंडे कुटुंब घाबरले. त्यावर क्षणाचाही विलंब न करता मुंडे यांनी दोन्ही लेकरांना तात्काळ दवाखान्यात नेण्याचा प्रयत्न केला. परंतु तोपर्यंत काळाने घात केला. उपचार मिळण्यापुर्वीच कु. कोमल व शिवम या चिमुकल्या बहिणभावाचा मृत्यु झाला. या घटनेमुळे संपूर्ण कोयाळ गावावर शोककळा पसरली असून, मुंडे कुटुंबीयांवर दु:खाचा डोंगर कोसळला आहे. सर्पदंशामुळे एका घरातील दोन निष्पाप जीवांचा बळी गेल्याने सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे.

### शनिवारी गावात एकही चुल पेटली नाही

● शुक्रवारी मध्यरात्री साप चावल्याने कोयाळ येथील मुंडे कुटुंबातील चिमुकल्या बहिणभावाचा दुर्दैवी मृत्यु झाल्याच्या घटनेने संपुर्ण कोयाळ गाव शोकसागरात बुडाले असुन, या घटनेमुळे गावात एकाही घरात चुल पेटली नव्हती. संपुर्ण गाव उपाशी होते.

# वाल्मिक कराडला तुरुंगात VIP ट्रीटमेंट, जामिनावर सुटलेल्या बडतर्फ रणजित कासलेचा दावा



बीड : मस्साजोगचे सरपंच सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येप्रकरणी वाल्मिक कराड न्यायालयीन कोठडीत आहे. राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते धनंजय मुंडे यांचा विश्वासू म्हणून ओळखल्या जाणाऱ्या वाल्मिक कराडला तुरुंगात व्हीआयपी ट्रीटमेंट मिळत आहे, असा आरोप जामिनावर सुटलेल्या बडतर्फ पोलीस उपनिरीक्षक रणजित कासलेने केला आहे. न्यायालयीन कोठडीत असताना स्वत:च्या डोळ्यांनी वाल्मिक कराडला मिळत असलेली विशेष वागणूक बघितली; असे रणजित कासलेने सांगितले. सोशल मीडियावर पोस्ट करुन त्याने ही माहिती सार्वजनिक केली आहे.

वाल्मिक कराडला दररोज तुरुंगामध्ये पोटभर जेवण दिले जाते. चांगल्या कपात गरम चहा मिळतो. जेवणाव्यतिरिक्त एरवी खाण्यापिण्यासाठी वेगवेगळ्या प्रकारचे फरसाण, चिवडे मिळतात. जेवणासाठी त्याला तेल लावलेल्या गरमागरम मऊ लुसलुशीत पोळ्या मिळतात. दर बुधवारी आणि रविवारी पोटभर चिकन दिले जाते. हे सगळे स्वत:च्या डोळ्यांनी बघितल्याचे जामिनावर सुटलेल्या बडतर्फ पोलीस उपनिरीक्षक रणजित कासलेने सांगितले. तुरुंग प्रशासनाने काही दिवसांतच मला दुसऱ्या कोठडीत ठेवले. मला वाल्मिकच्या हालचाली लगेच कळू नये यासाठी ही खबरदारी घेण्यात आली. एवढे करुनही मी वाल्मिकला मिळणाऱ्या वागणुकीविषयी नाराजी व्यक्त करतोय हे लक्षात आल्यावर मला जामीन मिळावा यासाठी हालचाली झाल्या, असा दावा रणजित कासलेने केला आहे.

कासलेवर ॲट्रॉसिटी, फसवणूक तसेच निवडणूक काळातील दोन गुन्हे अशा एकूण चार गुन्ह्यांची नोंद आहे. या गुन्ह्यांमुळेच त्याला पोलीस दलातून बडतर्फ करण्यात आले आहे. नुकताच तो जामीन मिळाल्यामुळे तुरुंगाबाहेर आला आहे. बाहेर आल्यावर सोशल मीडिया पोस्ट करुन रणजित कासले नव्याने चर्चेत आला आहे.

# विशेष प्राविण्यासह उत्तीर्ण झाल्या बद्दल सत्कार व कौतुक



माजलगाव : माहेश्वरी सभेच्या वतीने श्रेया गणेश लोहिया हीने १० वीत ८८ टक्के गुण मिळवुन विशेष प्राविण्यासह उत्तीर्ण झाल्या बद्दल सत्कार व कौतुक करण्यात आले असता माहेश्वरी सभेचे पदाधिकारी बांधव उपस्थित होते.

# अमावस्या निमीत्त जटवाडा येथे होनार पंचामृत अभिषेक व महाप्रसाद

## अभिषेक णमोकार भक्ती मंडळचा सानिध्यात होनार



छत्रपती सभाजीनगर प्रतिनिधी – श्री.1008 संकटहर पाश्र्वनाथ दिगंबर जैन अतिशय क्षेत्र जैनगिरी जटवाडा येथे दिनांक 27 मे मगळवार 2025 रोजी अमावस्या निमीत्त सकाळी १० वाजता मुलनायक श्री.संकटहर पाश्र्वनाथ भगवंताचा पंचामृत अभिषेक णमोकार भक्ती मंडळचा सानिध्यात करण्यात येणार आहे. यावेळी सर्व उपस्थित समाज बांधवांना सकाळी 11ते 2 या वेळेस अभिनंदन बाबूराव साखरे रेखा अभिनंदन साखरे बाहुबली नम्रता साखरे प्रिया खडके प्रिती वैभव गुलाखे सम्यक संस्कृती श्रियम साखरे जैन परीवार रामनगर छत्रपती सभाजीनगर यांच्या वतीने महाप्रसाद देण्यात येणार आहे.

अमावस्या निमीत्त सकाळी १० वाजता मुलनायक भगवंताचा पंचामृत अभिषेक नित्यनियम पुजा आरती करण्यात येणार आहे तरी समाज बांधवांनी मोठया संख्येने उपस्थित राहुन अभिषेक व महाप्रसादाचा लाभ घ्यावा असे आवाहन महाप्रसादी दाता परिवार व जटवाडा क्षेत्राचे विश्वस्थ मंडळ यांनी केले आहे. श्री. क्षेत्र जैनगिरी येथे महिन्याच्या प्रत्येक अमावस्येला भगवंताचा पंचामृत अभिषेक करण्यात येत असतो तसेच यावेळी महाप्रसादाचेही आयोजन केले जाते

# राजेंद्र हगवणेचा लॉकर सील, नीलेश चव्हाणविरुद्ध गुन्हा दाखल

पुणे : वैष्णवी हगवणेचा छळ करून तिला आत्महत्येस प्रवृत्त केल्याप्रकरणी सासरा राजेंद्र हगवणे आणि दीर सुशील हगवणे या दोघांना २८ मे पर्यंत पोलीस कोठडी ठोठावण्यात आली आहे. तर वैष्णवीचा पती शशांक हगवणे, सासू लता, नणंद करिष्मा या तिघांना २६ मे पर्यंत पोलीस कोठडी ठोठावण्यात आली आहे. पैशांसाठी सासरच्यांकडून होणाऱ्या छळाला त्रासलेल्या वैष्णवीने गळफास घेत आत्महत्या केली. या प्रकरणात आता पुढील कायदेशीर कारवाई सुरू आहे.

बावधन पोलिसांनी हगवणे कुटुंबीयांची कसून चौकशी केली. वैष्णवीच्या बाळाची हेळसांड केल्याप्रकरणी दाखल गुन्ह्यातील कलमात वाढ करीत नीलेश चव्हाणलाही आरोपी करण्यात आले आहे.


# शोभादेवी महिला सेवाभावी संस्थेच्या 6 शाळांचे शालांत परीक्षेत घवघवीत यश


गेवराई (प्रतिनिधी) तालुक्यातील शोभादेवी महिला सेवाभावी संस्थेच्या ग्रामीण भागात असलेल्या सहाही माध्यमिक शाळांनी एस.एस.सी. बोर्ड परीक्षेतील निकालाची परंपरा कायम ठेवली असून ग्रामीण भागातील विध्यार्थ्यांनी शालांत परीक्षेत घवघवीत यश संपादन केले आहे.

दि 13 मे 2025 रोजी शालांत परीक्षेचा निकाल जाहीर झाला. यात शोभादेवी महिला सेवाभावी संस्था गेवराई संचालित असलेल्या अहिल्याबाई होळकर विद्यालय, खांडवी (100 टक्के), राजमाता जिजाऊ विद्यालय, माटेगाव (100 टक्के), राजमाता जिजाऊ विद्यालय, रोहितळ (100 टक्के), राजमाता जिजाऊ विद्यालय, भोगलगाव (100 टक्के), राजमाता जिजाऊ विद्यालय, रानमळा (95 टक्के), राजमाता जिजाऊ विद्यालय, शेकटा (90 टक्के) असा निकाल नुकताच जाहीर झालेल्या शालांत परीक्षेत लागला आहे. ग्रामीण भागातील या शाळांनी प्रतिकूल परिस्थितीत घवघवीत यश संपादन केल्याने शाळेतील सर्व विद्यार्थ्यांसह, प्रशासकीय अधिकारी तथा मुख्याध्यापक प्रमोद देसले, मुख्याध्यापक केशव तळेकर, मुख्याध्यापक अमोल राजापूरकर, मुख्याध्यापक दीपक गरुड, मुख्याध्यापक अविनाश पंडित, मुख्याध्यापक राजेंद्र क्षिरसागर, व सर्व शिक्षकांचे माजी राज्यमंत्री बदामराव पंडित, संस्थेच्या अध्यक्षा सौ गिरीकाभाभी पंडित, जि.प.सभापती युधाजित पंडित, संस्थेच्या सचिव सौ अनुरूपाताई पंडित, युवानेते यशराज पंडित यांनी अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या आहेत.

## सकारात्मक बातमी ➤ नामच्या मोफत कामाचे कौतुक

# मस्साजोगची नदी पाण्याने खचाखच भरली





बीड (प्रतिनिधी) नाम फाउंडेशन मार्फत मोफत मशीन आणि मोफत डिझेल देऊन येथील जवळपास तीन किलोमीटर अंतरावरील नदीमध्ये खोलीकरण आणि रुंदीकरण करण्यात आले. मे महिन्यात आलेल्या अवकाळी पावसाने ही नदी खचाखच भरली असून परिसरातील गावातील शेतकऱ्यांनी नामचे कौतुक केले आहे. आज जनआंदोलनाचे विश्वस्त ॲड. अजित एम. देशमुख यांनी या साठलेल्या पाण्याची पाहणी केली.

सलग तीन किलोमीटर पाणी साठणार असल्याने आता या गावातील शेतकऱ्यांना फार मोठी ऊर्जा मिळाली आहे. शेतकऱ्यांना दोन पिके बिनधास्त घेता येतील आणि प्रत्येक वर्षी या पाण्याचा फायदा घेता येईल. दोन दिवसात झालेल्या पावसाने अनेकांच्या विहिरीत पाणी आले असून अनेकांची बंद पडलेले पाण्याचे बोअर देखील चालू झाले आहेत, असेही ग्रामस्थांनी यावेळी सांगितले.

नदीत साठलेले पाणी पाहण्यासाठी शेतकऱ्यांचा ओढा वाढला असून एक वेगळा आनंद परिसरातील शेतकऱ्यांच्या चेहऱ्यावर दिसत आहे. त्यामुळे नाम फाउंडेशनच्या कामाचे अनेक जण कौतुक करत आहेत.

या गावातून जाणारी नदी खोलीकरण आणि रुंदीकरणाचे काम गेल्या दीड महिन्यापूर्वी नामने हाती घेतले होते. आणखी काही दिवस काम चालले असते. परंतु दररोज पडत असलेल्या पावसामुळे मशीन चांगल्या पद्धतीने काम करू शकत नव्हती. त्यामुळे आणि ठरल्याप्रमाणे सर्व काम पूर्ण झाल्यामुळे नामच्या कामाला यश आले आहे. या कामावर ॲड. अजित देशमुख यांनी सातत्याने लक्ष दिले. आणि काम चांगले व्हावे यासाठी प्रयत्न केले.



पाणी अडवण्यासाठी नदीचे रुंदीकरण शक्य तेवढे मोठ्या प्रमाणात करण्यात आले असून खोलीकरणात देखील काही ठिकाणी पंधरा फूट पाणी साठले आहे. आणखी पाणी साठण्याची मोठी क्षमता त्या ठिकाणी आहे. त्यामुळे पाणीसाठा मोठ्या प्रमाणात उपलब्ध झाला आहे. या पाहणीच्या वेळी भागवत कदम, तुषार देशमुख, मंगेश देशमुख, मोरे यांच्यासह परिसरातील शेतकरी उपस्थित होते.